# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क / ई-सुविधा शुल्क / विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणेबाबत तसेच सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय/तुकडी बंद करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत संलग्न महाविद्यालये / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांनी त्यांच्या महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थांमध्ये विद्यापीठ मान्यता असलेल्या अभ्यासक्रमासाठी सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क, ई-सुविधा शुल्क तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी नोंदणी शुल्क भरणे आवश्यक आहे.

वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत -

| | | |
|---|---|---|
| १. | प्रतिवर्षीप्रमाणे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाचे नियमित वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणेची अंतिम तारीख (निरंतर संलग्नीकरण मिळाले असले तरी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे.) लेखाशिर्षक - A-2-R-1 | दि.३१ जुलै, २०१६ पर्यंत. |
| २. | विलंब शुल्कासह वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरण्याची तारीख - | |
| | १. विहीत शुल्क + विहीत शुल्काच्या १० % विलंब शुल्क | ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत. |
| | २. विहीत शुल्क + विहीत शुल्काच्या २० % विलंब शुल्क | ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत. |
| | ३. विहीत शुल्क + विहीत शुल्काच्या २५ % विलंब शुल्क | ३१ ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत. |
| ३. | उपरोक्त तारखांपर्यंत जी महाविद्यालये वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणार नाहीत ती महाविद्यालये महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील तरतुदीनुसार योग्य त्या कारवाईस पात्र समजण्यात येतील. | |
| ४ | महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेस स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरही वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरणे आवश्यक आहे. तथापि, सदरचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क प्रतिवर्षी न भरता स्वायत्तता प्राप्त झालेल्या कालावधीसाठी एकरकमी शुल्क भरणे आवश्यक आहे. | |
| ५. | पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वार्षिक संलग्नीकरण शुल्क स्वतंत्र भरणे आवश्यक आहे. | |
| ६. | संदर्भ क्र.:संलग्नता टी-२/१९, दि.०५ मे, २०१५ च्या परिपत्रकामध्ये निर्धारित केल्यानुसार वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरावे. सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD या लिंकच्या Affiliation T-2 Circulars या पेजवर उपलब्ध आहे. | |
| ७. | शासन निर्णय क्रमांक ई सेवा २००६/(१९१/०६)/मशि-१, दि.१९ जून,२००६ नुसार प्रती विद्यार्थी रू.५०/- प्रमाणे प्रतिवर्षी ई-सेवाशुल्क भरणे आवश्यक आहे. सदरचा शासन निर्णय विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD → Circular या लिंकवर उपलब्ध आहे. (लेखा शिर्षक - E-4-R-11) | |
| ८. | विद्यापीठ परिनियम ५९० नुसार पदव्युत्तर महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी शुल्क विहीत केल्यानुसार भरणे आवश्यक आहे. (लेखा शिर्षक - A-2-R-2) | |
| ९. | सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था तसेच संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांमधील विद्याशाखा/अभ्यासक्रम/ विषय/तुकडी बंद करण्याबाबतचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम ९२ नुसार विद्यापीठाकडे दि.०१ ऑगस्ट,२०१६ किंवा त्यापूर्वी आवश्यक त्या कागदपत्रांसह विहीत शुल्क भरून सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. | |

कळावे.

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

संदर्भ क्र.: संलग्नता टी-२/ 33
दि. 3 JUN 2016
प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
प्रत :- १) पात्रता विभाग २) नगदी विभाग